जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १३ दिनांक - ०८/०१/२०२५**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर

## अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखेची कारवाई १११ ग्रॅम अफिम विक्री करणा-या एका इसमांस केले जेरबंद

अंमली पदार्थ विरोधी पथक ०१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम,सहा पोलीस निरीक्षक,अनिकेत पोटे, व स्टाफ असे दिनांक ०७/०१/२०२५ रोजी पुणे शहरातील चंदननगर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना पेट्रोलिंग दरम्यान पुणे खराडी पुणे येथे पुजा सुपर मार्केट समोर,तुकाराम नगर,खराडी पुणे येथे सार्वजनिक रोडवर एक इसम नामे विजयसिंग खिंमसिंग राजपुरोहित वय ३७ वर्षे, रा.क्रांतिपार्क लेन नं ०९,कोलंबीया एशीया,हॉस्पीटल शेजारी,खराडी पुणे. हा संशयीतरित्या मिळुन आल्याने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याची व त्याच्या ब्राऊन हॅण्ड बॅग ची झडती घेतली असता त्यामध्ये किं.रु.२,२२,६००/-रु कि.चा ऐवज मिळुन आला असुन त्यामध्ये २,२२,०००/- रु.चा, १११ ग्रॅम आफिम हा अंमली पदार्थ, ५००/- रु.कि. एक पांढ-या रंगाचा इलेक्ट्रीक वजन काटा, १००/- रु.कि. एक ब्राऊन रंगाची हॅण्ड बॅग, ००.००/- रु.किं. एक सोनेरी रंगाची रिकामी प्लॅस्टीकची पिशवी, ००.००/- रु.किं.चे तिन पारदर्शक प्लॅस्टीकच्या रिकाम्या पिशव्या,असा ऐवज अनाधिकाराने,बेकायदेशिररित्या विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आला.म्हणुन त्याचे विरुध्द चंदननगर पो स्टे गु.र.नं.१५/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),१७(ब), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.निखील पिंगळे, मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १,श्री गणेश इंगळे, यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे.शहर कडील श्री.उल्हास कदम, सहा पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे,,पोलीस अंमलदार संदिप शिर्के, मारुती पारधी, प्रविण उत्तेकर, विशाल दळवी, संदेश काकडे, दत्ताराम जाधव, विनायक साळवी, दया तेलंगे, रेहाना शेख, योगेश मोहिते यांनी केली आहे.